म.भा.शि.प्र. मंडळ संचलित

कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी

१२ वे युवा ग्रामीण साहित्य संमेलन

शनिवार दि. १५/०२/२०२०

-अहवाल-

विद्यार्थ्यांमध्ये लेखन, वाचन व श्रवण कौशल्याचा विकास व्हावा म्हणून वाङ्‌मय मंडळ व मराठी विभागाच्यावतीने महाविद्यालयात प्रतिवर्षी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमधून चांगले लेखक , चांगले वाचक व रसिक श्रोते घडावेत यासाठी हा प्रयत्न असतो. चालू वर्षी आदर्श कॉलेज, विटा अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत १२ व्या युवा ग्रामीण साहित्य संमेलनासाठी ज्येष्ठ लेखिका नीलम माणगावे यांची निवड करण्यात आली. त्यांचे 'साक्षीदार', 'तीच माती तेच आकाश', 'शांते तू जिंकलीस', 'ज्वालामुखीच्या तोंडावर', 'रथवादळ' हे कथासंग्रह; 'गुलदस्ता', 'शतकाच्या उंबरठ्यावर', 'उध्वस्तायन', 'कंदील आणि काठी' हे काव्यसंग्रह; 'डायरी', 'जिद्द', 'सोन्या', 'मृत्यदंड', 'शोध', 'जलप्रलय', 'ब्रेकिंग न्युज' या कादंबऱ्या व इतर काही ग्रंथ प्रसिध्द आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाचे दोन साहित्य पुरस्कार मिळाले आहेत. संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून मा.भा.शि.प्र. मंडळाचे चेअरमन श्री. सुरेंद्र गुदगे यांनी उत्तम जबाबदारी पार पाडली.

संमेलनाध्यक्षा मा.नीलम माणगावे म्हणाल्या, "लेखक आपल्या अनुभवांना शब्दरूप कसे देतो, ते विद्यार्थ्यांनी अभ्यासावे. साहित्य संमेलनात अनेक कवी कथाकारांची भेट होते. त्यांनी साहित्यातून व्यक्त केलेले अनुभव प्रत्येकाने कमी-जास्त फरकाने अनुभवलेले असतात. तेच योग्य शब्दांत व्यक्त केले की साहित्याची निर्मिती होते. ग्रामीण जीवनातील समृध्द अनुभवविश्व विद्यार्थ्यांनी कथा-कवितेतून व्यक्त करावे."

Scanned with Oken Scanner

स्वागताध्यक्ष श्री. सुरेंद्र गुदगे म्हणाले " गेली १२ वर्ष हे संमेलन सातत्य टिकवून आहे. या संमेलनातून अनेक विद्यार्थी घडले, कवी-लेखक घडले, याचा आम्हाला अभिमान आहे. साहित्यिकांना दूरदृष्टी असते. त्यामुळे त्यांच्या विचारस्वातंत्र्याचा आपण आदरच केला पाहिजे.''

'साहित्यचर्चा' या दुसऱ्या सत्रात कडेपूर येथील मराठीच्या प्राध्यापिका डॉ. विजया पवार यांनी 'लोकसाहित्य: एक सांस्कृतिक ठेवा' या विषयावर मार्गदर्शन केले. या म्हणाल्या "लोकसाहित्य म्हणजे पिढयान्‌पिढयांनी जपलेले सांस्कृतिक शहाणपण आहे. पूर्वी जात्यावर दळण दळताना किंवा विविध सणसमारंभात अनेक गाणी म्हटली जात होती. विद्यार्थ्यांनी जुन्या पिढीकडून हे लोकसाहित्य ऐकून घेतले पाहिजे. जतन केले पाहिजे.''

तिसऱ्या सत्रात कथाकार मा. सर्जेराव खरात, कुंडल यांचे बहारदार कथाकथन झाले. त्यांनी 'दिशा' ही कथा सादर करून श्रोत्यांना ऐकता ऐकता हसविले आणि रडविले.

चौथ्या सत्रात कवयित्री लता ऐवळे यांच्या अध्यक्षतेखाली रंगतदार कविसंमेलन झाले. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन कुंदा लोंखडे यांनी केले. लता ऐवळे आपल्या कवितेत म्हणाल्या,

तुझ्या मनगटावर दादा बांधिला मी धागा  
ठेव काळजात तुझ्या मला थोडी तरी जागा  
तुझ्या फुलू दे संसार वेल जाऊ दे मांडवाला  
जीव शिणलेला माझा यावा तुझ्या विसाव्याला

या शिवाय किरण अहिवळे, महेश मोरे, अनुराधा गुरव, रंजना सानप, डॉ. महेशकुमार सोनावणे, प्रकाश शिंदे, विठ्ठल भागवत, डॉ. हेमांगिनी माने, श्रीमयी दिवटे, अंकुश चव्हाण, अंजली गरवारे, वंदना लिपारे, श्यामसुंदर मिरजकर, शिवप्रसाद पवार, आनंद बागल, चंद्रकांत हुलगे यांनी आपल्या कविता सादर केल्या.

Scanned with Oken Scanner




Scanned with Oken Scanner




Scanned with Oken Scanner




Scanned with Oken Scanner